# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

अभिवेदन (Representation) क्रमांक १९२, १९३, १९४, १९५, १९६, १९७, १९८, १९९ व २०० / २०२२

नवीन वीज जोडणी वेळेत न केल्याने कृतीमानकांनुसार नुकसान भरपाई मिळण्याबाबत

| क्र. | अपिलार्थी | ग्राहक क्र. | अभिवेदन क्र. |
|---|---|---|---|
| १ | आनंदा शिवराम बिरामणे | १९४३४३१०१७४० | १९२ / २०२२ |
| २ | विनायक शिवराम बिरामणे | १९४३४३१०१७५८ | १९३ / २०२२ |
| ३ | साहेबराव शिवराम बिरामण | १९४३४३१०१७६६ | १९४ / २०२२ |
| ४ | वसंत शिवराम बिरामण | १९४३४३१०१७७४ | १९५ / २०२२ |
| ५ | हनमंत शिवराम बिरामणे | १९४३४३१०१७८२ | १९६ / २०२२ |
| ६ | ताराबाई हरीष धनावडे | १९४३४३१०१८१२ | १९७ / २०२२ |
| ७ | लक्ष्मी सुभाष शिंद | १९४३४३१०१७९१ | १९८ / २०२२ |
| ८ | हेमा अशोक बावळेकर | १९४३४३१०१८०४ | १९९ / २०२२ |
| ९ | मंगल विजय निकम | १९४३४३१०१७३१ | २०० / २०२२ |

................अपिलार्थी

विरूध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, वाई (महावितरण) ........................................................ प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- संजिव एस. ईंगळे, ग्राहक प्रतिनिधी
रावसाहेब एन चव्हाण, ग्राहक प्रतिनिधी

प्रतिवादीतर्फे :- एस. के. सोनवळकर, कार्यकारी अभियंता, वाई

**कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)**

सुनावणी तारीख :- २ फेब्रुवारी २०२३

आदेश दिनांक :- १० फेब्रुवारी २०२३

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, बारामती परिमंडळ, (मंच) यांच्या दिनांक २५ ऑगष्ट २०२२ च्या आदेशाविरुध्द उपरोक्त अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक ३ नोव्हेंबर २०२२ रोजी दाखल केले. अभिवेदनाची छाननी केली असता अपिलार्थींच्या नजरेस त्रुटी दाखविण्यात आल्या. अपिलार्थींनी त्रुटींचे निराकरण कल्यावर दिनांक २२ डिसेंबर २०२२ रोजी अभिवेदन दाखल केले.

२. मंचाने २५ ऑगष्ट २०२२ रोजीच्या आदेशान्वये तक्रारदारांचो तक्रार क्रमांक १६,१७,१८, १९,२२,२३,२४,२५ आणि २६/२०२२ नामंजूर केले.

३. अपिलार्थींच्या अभिवेदनातील लेखी निवेदन व दिनांक २ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे झालेल्या सुनावणीदरम्यान चर्चा केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे आहेत.

- अपिलार्थींनी लक्ष्मीप्रसाद, नटराज कॉम्पलेक्स, पाचगणी, तालूका महाबळेश्वर, जिल्हा सातारा येथे नवीन घरगुती कनेक्शनसाठी महावितरणकडे दिनांक १३ जानेवारी २०२१ रोजी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केल व त्या अर्जांची हार्ड कॉपी दिनांक १५ जानेवारी २०२१ रोजी पाचगणी महावितरण कार्यालयाकडे सादर केली.

- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी अणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम २०२१ (कृती मानके व भरपाईचे निश्चितीकरण विनियम २०२१) मधील विनियमानूसार अपिलार्थी ग्राहकास नवीन वीज जोडणी अर्ज केल्यापासून ३० दिवसाच्या आत चलन देणे बंधनकारक असताना, चलन (डिमांड नोट) वेळेत मिळाले नाही, सदर बाब अपिलार्थींनी प्रतिवादी महावितरण कंपनीच्या निदर्शनास आणून दिली व झालेल्या विलंबाबाबत कृतीची मानके विनियम २०२१ नुसार नुकसान भरपाईची मागणी केली.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

- अपिलार्थी व अपिलार्थी यांच्या ग्राहक प्रतिनिधीने वारंवार तक्रारी करूनही प्रतिवादी महावितरणने त्यांच्याच परिपत्रकांचा चुकीचा अर्थ घेऊन अपिलार्थींचे चलन, कृतीमानकेचा भंग करून उशीराने दिल्याबाबतची बाब अपिलार्थींनी महावितरणच्या निदर्शनास आणून दिली. महावितरणने कृतीमानकेप्रमाणे चलन देणेस विलंब करुनही कृतीमानकेप्रमाणे नुकसान भरपाई देणेस टाळाटाळ करीत असल्याने अपिलार्थींनी दिनांक १५ फेब्रुवारी २०२२ व दिनांक ९ मार्च २०२२ रोजी अर्ज सादर केल. परंतू त्यावर कोणतेही उत्तर अपिलार्थीस महावितरणने दिले नाही.

- अपिलार्थींनी नवीन वीज जोडणी मिळण्याबाबत भरपूर पाठपुरावा केल्यानंतर, नवीन रोहीत्र उभारून अपिलार्थीस दिनांक २६ डिसेंबर २०२१ रोजी वीज कनेक्शन दिले. अपिलार्थीने नमुद केले की, नवीन वीज कनेक्शनचा अर्ज केल्यापासून ३० दिवसात चलन मिळणे बंधनकारक आहे, तसे न झाल्यास अर्ज केलेल्या दिनांकापासून प्रत्येक आठवडयाला रू.१००/- इतकी दंडात्मक कारवाई करावी अशी स्पष्ट तरतूद कृती मानके व भरपाईचे निश्चितीकरण विनियम २०२१ मध्ये आहे. त्याप्रमाणे दंडात्मक कारवाई उपकार्यकारी अभियंता, उपविभाग पाचगणी यांचेकडून (२८ आठवडे × रू.१००/-) रू.२८००/- वसूल करण्यात यावी. तसेच अर्ज दिल्यापासून अपिलार्थीस कनेक्शन दिल्यापासून हे सध्या अस्तित्वात असलेल्या प्रणालीवरती, एक महिन्याचे आत देणे बंधनकारक आहे; तसे न झाल्यास, अर्ज केलेल्या दिनांकापासून प्रत्येक आठवडयाला रू.१००/- इतकी दंडात्मक कारवाई करावी, अशी स्पष्ट तरतूद आहे. त्याप्रमाणे रू.२४००/- (२४ आठवडे × रू.१००/-) दंडात्मक कारवाई उपकार्यकारी अभियंता, उपविभाग पाचगणी यांचकडून वसूल करण्यात यावी.

- अपिलार्थींनी दिनांक २३ मे २०२२ रोजी मंचाकडे तक्रार दाखल केली. मंचाने २५ ऑगष्ट २०२२ रोजीच्या आदेशान्वये तक्रारदारांची तक्रार क्रमांक १६, १७, १८, १९, २२, २३, २४, २५ आणि २६/२०२२ नामंजूर केल्या. सदर आदेश हा माननीय आयोगाच्या नियमांची पायमल्ली करणारा आहे. नवीन कनेक्शन देण्याबाबत अपिलार्थींनी वारंवार पाठपुरावा केलेला आहे मात्र कोवीड - १९ ची महामारी मध्ये राज्य शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनूसार शासकीय कार्यालियातील उपस्थिती १५% पेक्षाहून अधिक नसणार याची खबरदारी घेण्यात आली. त्यामुळे या परिस्थितीमध्ये सेवा देण्यास विलंब झालेला आहे, परंतू निष्काळजीपणा किंवा जाणीवपर्वक विलंब झालेला दिसून येत नाही. मंचाने सदर निष्कर्ष

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

हा कोणत्या वैध पुराव्याच्या आधारे काढला याचा बोध होत नाही, या निष्कर्षाच्या आधारे नुकसान भरपाई नाकारणे हे कायदाबाह्य आहे.

- पाचगणी उपविभागाने दिनांक १५ जानेवारी २०२१ रोजी पासून सव्हे करणेचे काम सोडून, चलन देणेच्या कामाव्यतिरीक्त बरीच कामे केली. माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अपिलार्थीने अर्ज केला असता, अर्ज केल्यानंतर १७४ ग्राहकांना चलन देण्यात आले व २८० ग्राहकांना वीज जोडणी दिली. मग अपिलार्थींच्या कामाच्याबाबतीत चलन देण्याचे कामासाठी कोवोड - १९ ची अडचण कशी येते? याबाबीची शहानिशा करण्याची गरज आहे. अपिलार्थीने मागितलेल्या कनेक्शनच्या ठिकाणी ग्राहक क्र.१९४३४००८९३८२ हे थ्रीफेज घरगुती कनेक्शन अस्तित्वात असल्याचे नमुद केले व या कनेक्शनवरून अपिलार्थी यांना वीज पुरवठा चालू आहे ही बाब मंचाने मान्य करणे बेकायदेशीर ठरते.

- अपिलार्थीने नमुद केले की, मंचाच्या आदेशात, सव्हला विलंब झाला व चलन देणेस विलंब झाला या बाबींशी या कारणीमिमांसाचा कोणताही संबध येत नाही. सदरच्या बाबी या वीज पुरवठा देणेकरीता निगडीत आहेत, त्याचा सर्व्हे करणेशी व चलन देण्याशी काहीही संबध नाही. या सर्व बाबी अपिलार्थींच्या मागणीशी चुकीच्या पध्दतीने निगडित केल्या आहेत. मंचाने अपिलार्थीस चलन देण्यास उशीर झाला ही बाब मान्य केली. त्यामुळे अपिलार्थीचे अपिल मान्य करून कृतीमानके नुसार नुकसान भरपाईची मागणी मान्य करण्यात यावी. तसेच महावितरण विभागीय कार्यालय वाई व पाचगणी यांचेकडून झालेल्या विलंबाबाबत जबाबदारा अधिकारी व कर्मचारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी अशी मागणी अपिलार्थींनी अभिवेदनात केली आहे.

४. प्रतिवादीने दिनांक २३ जानेवारी २०२३ रोजीच्या पत्रान्वये लेखी उत्तर दिले. लेखी उत्तरातील व दिनांक २ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे झालेल्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे आहेत.

- अपिलार्थी श्री. वसंत शिवराम बिरामणे व इतर ८ ग्राहक याचे दिनांक १५ जानेवारी २०२१ रोजी नवीन वीज जोडणीसाठीचे अर्ज महावितरण पांचगणी शाखा कार्यालयात दिनांक दिनांक १९ जानेवारी

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

२०२१ रोजी प्राप्त झाले, त्यानुसार त्याच दिवशी वीज जोडणो देण्याच्या जागेची स्थळतपासणी शाखा अभियंता पाचगणी शहर व उपकार्यकारी अभियंता पाचगणी उपविभाग यांनी केली.

- स्थळ तपासणीमध्ये निदर्शनास आले की अपिलार्थींना फाईनल प्लॉट नं २८ पाचगणी येथील लक्ष्मीप्रसाद या नावे असलेल्या नटराज कॉम्पलेक्स या इमारतीतील ९ रूम्सना कनेक्शन हवे होते, सदर ९ रूम एकाच इमारतीतील असल्याने सर्वांना ग्रुप ऑफ कन्झूमर असे संबोधन क्रमप्राप्त झाले. सदर इमारत जुनी असून त्याठिकाणी ग्राहक क्र.१९४३४००८९३८२ हे कोंडाबाई शिवराम बिरामणे यांचे नावे असलेले ३ फेज घरगुती कनेक्शन अस्तीत्वात असून सदर कनेक्शनवरून सर्व ९ अर्जदारांना वीज पुरवठा चालू असल्याचे निदर्शनास आले. तसेच अपिलार्थींना वेगवेगळे कनेक्शन पाहिजे असल्याने त्यांनी वेगवेगळे अर्ज केले आहेत हे निदर्शनास आले. अपिलार्थींना २ केडब्लू प्रती कनेक्शन प्रमाणे ९ अर्जदारांची एकुण १८ केडब्लू इतकया विद्युत भाराची आवश्यकता होतो.

- सर्व कनेक्शनस ३० मीटर अंतरावर असलेल्या एसटी स्टँड रोहीत्र नं.(४१२०४०७) लघुदाब वीज वाहिनीवर येते. सुमारे, सदर वीज पुरवठा मागणीचे अंदाजपत्रक सदरहू रोहीत्रावरून तयार करून पुढील मंजूरीसाठी विभागीय कार्यालयास सादर करणेबाबत उपकार्यकारी अभियंता यांना शाखा अभियंता यांनी दिनांक १९ जानेवारी २०२१ रोजी निर्देशीत केले होते. त्यामुळे अपिलार्थींची अर्ज केल्यापासून १० दिवसाच्या आत स्थळतपासणी झाली नाही हे अपिलार्थींचे म्हणणे मान्य नाही.

- नवीन कनेक्शन देण्यासाठी महावितरण मुख्यालयाने दिनांक १९ मार्च २०१९ व दिनांक ३० सप्टेंबर २०१९ च्या परीपत्रकानूसार मार्गदर्शक तत्वे ठरविली आहेत. हि मार्गदर्शक तत्वे सर्वसाधारणपणे नॉरमल डेव्हलपमेंटसाठी वापरण्यात येतात. महावितरणचे अती दाट लोकवस्ती व मार्केट एरीयातील रहदारीच्या क्षेत्रात सुरक्षेच्या कारणास्तव तेथील रोहीत्र हे अतिसंवेदनशील आहे. अपिलार्थींचा वीज भार हा सुध्दा संवेदनशील क्षेत्रातील आहे. वरील परिपत्रकानुसार शाखा अभियंता यांनी त्या रोहीत्राची क्षमता तपासली असता ते २०० केव्हीए क्षमतेचे असून त्यावरील आयटी अहवालानुसार ३४८ केडब्लू इतका कनेक्टेड लोड असल्याचे निदर्शनास आले, त्यामुळे सदर रोहीत्रावरून वीज कनेक्शन देणे शक्य नव्हते. सर्वसाधारणपणे महावितरणच्या दिनांक १९ मार्च २०१९ व दिनांक ३० सप्टेंबर २०१९ च्या परीपत्रकानूसार सदरहू रोहीत्रावरून कनेक्शन देणेआधी महावितरणच्या परिपत्रकानूसार एखादया रोहीत्रावर ग्रुपमध्ये कनेक्शन दयायचे असल्यास त्या रोहीत्रावरील कनेक्टेड भार व नवीन येणारा भार

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

हा रोहीत्र क्षमतेच्या ८0% पेक्षा जास्त असल्याने रोहीत्र क्षमतावाढ प्रस्तावित करता येते का? याची तपासणी केली, परंतू सदर रोहीत्र दाट लोकवस्तीत व दुकानाच्या जागेत व रस्त्यालगत असल्याने, रोहीत्राची क्षमतावाढ करणे शक्य नव्हते, कारण त्यास प्लींथ व फेसींग करणेस जागा उपलब्ध नव्हती. तसेच कृती मानके व भरपाईचे निश्चितीकरण विनियम २०२१ मधील विनियम ३ नुसार सदर कनेक्शन देणेकामी अतिरीक्त रोहीत्र प्रस्तावित करणे क्रमप्राप्त होते.

- तदनंतर शाखा अभियंता यांनी सदर सर्व ९ कनेक्शन देणेकामी अंदाजपत्रकात अतिरीक्त रोहीत्र स्थापित करण्याकामी पुढील मंजूरीसाठी दिनांक २५ जानेवारी २०२१ रोजी उपविभागीय कार्यालयात सादर केले. अर्जदाराने अर्जासोबत १.३% डिडिएफ योजनेमधून अंदाजपत्रक मंजूरीकामी लागणारा बॉन्ड जमा न केल्याने शाखा अभियंता यांनी सदर अंदाजपत्रक कंपनीच्या एनएससी योजनेतून प्रस्तावित केले होते. तसेच महावितरणचे दिनांक १९ मार्च २०२१ च्या सुधारीत परीपत्रकानुसार लोड कॅल्कुलेशन करतेवेळी डायव्हरसिटी फॅक्टर २ धरणेकामी सुचीत केले आहे. त्याप्रमाणे जरी विचार केला, तरी ४१२०४०७ या रोहीत्रावरील कनेक्टेड लोड ३४८ केडब्लू, अधिक १८ केडब्लू, असा एकूण ३६६ केडब्लू होतो. यास डायव्हरसिटी फॅक्टर २ धरून हाच लोड १८८ इतका होतो, की जो विद्यमान २०० केव्हीए रोहीत्राच्या ८0% लोडपेक्षा जास्त होतो यामुळे वरील सुधारीत परिपत्रकानूसार सुध्दा सदर ९ कनेक्शन विद्यमान रोहीत्राची क्षमता नव्हती.

- दिनांक २५ जानेवारी २०२१ रोजी सदर कनेक्शन देणेबाबतचे अंदाजपत्रक उपकार्यकारी अभियंता पांचगणी उपविभागीय कार्यालयाकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांची छाननी केली असता पुढील मंजूरीसाठी दिनांक २८ जानेवारी २०२१ रोजी विभागीय कार्यालयाकडे तांत्रिक मंजूरीसाठी पाठविण्यात आले. त्यानंतर दिनांक १२ एप्रिल २०२१ रोजी उपविभागीय कार्यालयाने पाठविलेल्या अंदाजपत्रकातील त्रुटी इमेलद्वारे कळविल्या. परंतू कोवीड १९ च्या दुसऱ्या लाटेमुळे सदर त्रुटींचे निराकरण करण्यास पाचगणी उपविभागीय कार्यालयात कार्यरत असणाऱ्या कनिष्ठा अभियंता यांना विलंब झाला. तसेच सदर त्रुटींचे निराकरण करतेवेळी उपकार्यकारी अभियंता हे कौटुंबिक कारणास्तव एप्रिल महिन्यात रजेवर होते. तसेच, त्यानंतरच्या कालावधीत पांचगणी हा डोंगराळ व अतिवृष्टीचा प्रदेश असल्याने मे महिन्यापासून वादळी वारे व अवकाळी पावसामुळे वृक्ष कोसळल्यामुळे महावितरणच्या सामुग्रीचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. सदर नुकसानीची तात्काळ दुरूस्ती करून वीज पुरवठा पुर्ववत करणे अवघड व

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai
M.E.R.C.

जोखमीचे असते, त्यावर सतत देखरेख करावी लागते. तसेच सप्टेंबर २०२० पासून शाखा अभियंता पाचगणी उपविभाग हे पद रिक्त असल्याने त्या शाखेतील १२ गावांचा वीज पुरवठा सुरळीत ठेवण्याचे कामी विशेष प्रयत्न करावे लागले. त्यातच मे २०२१ मध्ये अतिवृष्ठीमुळे पाचगणी उपविभागात एचटी, एलटी लाईनचे नुकसान झाले. ते पुर्ववत करण्यास भरपूर वेळ लागला त्यामुळे विभागीय कार्यालियाने त्रुटोसंदर्भात पाठविलेला इमेल कोवीड १९ च्या दुसऱ्या लाटेमुळे व वादळ वाऱ्यामुळे झालेल्या ब्रेकडाऊनमुळे विलंब झाला.

- तदनंतर दिनांक ३ ऑगष्ट २०२१ रोजी उपकार्यकारी अभियंता यांनो अंदाजपत्रकातील त्रुटीचो पर्तता करण्यासाठी अपिलार्थीस कळविले असता कागदपत्रांची पुर्तता करण्याबाबत लेखी कळविले असता कागदपत्रे देणार नसल्याबाबत अपिलार्थींनी शाखा अभियंता यांना तोंडी कळविले. दिनांक १ सप्टेंबर २०२२ रोजी उपकार्यकारी अभियंता यांनी विभागीय कार्यालयास नवीन रोहीत्रासाठी पर्यायी जागा सुचविण्याबाबतचे इमेलद्वारे कळविले. दिनांक १५ सप्टेंबर २०२१ रोजी विभागीय कार्यालियाने अंदाजपत्रक मंजूर करून अनामत रक्कम भरण्याबाबत कोटेशन दिले, परंतू अपिलार्थीने दिनांक २८ ऑगष्ट २०२१ रोजी ऑनलाईन पध्दतीने कोटेशनचे पैसे भरले होते. दिनांक २३ सप्टेंबर २०२१ रोजी उपकार्यकारी अभियंता यांनी महावितरणच्या एनएससी योजनेतून अतिरीक्त रोहीत्र उभारणीचे काम करण्यासाठी सामुग्रीची मागणी केली त्यानुसार विभागीय कार्यालियाकडून तशी वर्क ऑर्डर दिनांक ८ नोव्हेंबर २०२१ रोजी देण्यात आली. दिनांक २४ डिसेंबर २०२१ रोजी अतिरीक्त रोहीत्र उभारणीचे काम पर्ण झाल्यावर दिनांक २६ डिसेंबर २०२१ रोजी अर्जदारास घरगुती कनेक्शन देण्यात आले.

- प्रतिवादींनी नमुद केले की, अपिलार्थींनी दिनांक १५ जानेवारी २०२१ रोजी वीज जोडणीसाठी केलेल्या अर्जाच्या दिवसापासून व त्यापुर्वीपासून ग्राहक क्रमांक १९४३४००८९३८२ या ३ फेज घरगुती कनेक्शनवरून वीज पुरवठा वापरत होते, त्यामुळे ते वीज वापरापासून वंचीत नव्हते.

- मंचाने निकाल देताना नमुद केले की, नवीन वीज जोडणीसाठी अपिलार्थींच्या मागणीचा वेळोवेळी पाठपुरावा प्रतिवादींने केला आहे, परंतू कोवीड-१९ महामारीबाबत राज्य सरकारच्या मार्गदर्शक सुचनानुसार कार्यालियीन कर्मचाऱ्यांच्या मर्यादीत उपस्थितीमुळे सेवा देण्यास विलंब झाला परंतू तो निष्काळजीपणामुळे वा जाणीवपर्वक केलेला नाही. मंचाने सर्व बाबींचा विचार करून योग्य तो निर्णय

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

दिलेला आहे. प्रतिवादीने विनंती केली की कोवीड-२०१९ महामारीमुळे उद्भवलेल्या परिस्थितीचा सहानभुतीपुर्वक विचार करून कृतीमानके नुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येऊ नये.

- प्रतिवादीने असे निदर्शनास आणले की, अपिलार्थींनी नवीन कनेक्शनन जोडणीबाबतची आकडेवारी दिली आहे ती संपुर्ण पांचगणी विभागातील आहे. सर्वसाधारणपणे या रोहीत्रावर एखादे दुसरे कमी भाराचे नवीन कनेक्शन जरी देण्यात आले असले तरी सुध्दा अपिलार्थींचा वीज भार जास्त असल्यामुळे त्यांना तसे कनेक्शन देण तांत्रीकदृष्टया व सुरक्षतेच्या कारणात्सव चुकीचे आहे.

- प्रतिवादीने असे नमुद केले की, अपिलार्थींचे प्रतिनिधी हे महावितरणचे माजी कर्मचारी असून ते अपिलार्थींची दिशाभुल करतात याची योग्य ती नोंद घेण्यात यावी.

- तसेच वीजपुरवठा देणेकामी कार्यकारी अभियंता व उपकार्यकारी अभियंता यांनी कोणतीही कसूर केलेली नाही, त्यामुळे, त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही होऊ नये व अपिलार्थी यांचे अभिवेदन फेटाळण्यात यावे ही विनंती.

**विश्लेषण व निर्णय**

५. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. सदर अभिवेदनाची सुनावणी दिनांक २ फेब्रुवारी २०२३ रोजी घेण्यात आली. अपिलार्थींनी नमुद केले की, वीज जोडणीचा अर्ज दिनांक १५ जानेवारी २०२१ रोजी पाचगणी महावितरण कार्यालयाकडे सादर केला. अपिलार्थींनी नवीन वीज जोडणी मिळण्याबाबत भरपूर पाठपुरावा केल्यानंतर, नवीन रोहीत्र उभारून अपिलार्थीस दिनांक २६ डिसेंबर २०२१ रोजी वीज कनेक्शन दिले.

६. अपिलार्थीने नमुद केले की, नवीन वीज कनेक्शनचा अर्ज केल्यापासून ३० दिवसात चलन मिळणे बंधनकारक आहे, तसे न झाल्यास अर्ज केलेल्या दिनांकापासून प्रत्येक आठवडयाला रू.१००/- इतकी दंडात्मक कारवाई करावी, अशी कृतीमानकांची पूर्तता न केल्यास ची तरतूद आहे. तथापि, कोटेशन देण्यासाठी २८ आठवडयांचा उशीर झाला.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

७. प्रतिवादीने असे नमुद केले की, वरील ९ अपिलार्थी ग्राहकांचा नवीन कनेक्शन अर्जानुसार १८ केडब्लू वीज भाराची आवश्यकता होती. एसटी स्टॅंड रोहीत्र हे पोल माउंटेड २०० केव्हीए क्षमतेचे असून त्यावरील आयटी अहवालानुसार ३४८ केडब्लू इतका कनेक्टेड लोड असल्याचे निदर्शनास आले, म्हणजे जवळ जवळ ९०% ते ९५% लोडेड होते. त्यामुळे सदर रोहीत्रावरून वीज कनेक्शन देणे शक्य नव्हते. अपिलार्थींकडे रोहीत्र बसविण्यासाठी जागेची मागणी केली असता, अपिलार्थींनी त्यास प्रतिसाद दिला नाही. महावितरणचे अती दाट लोकवस्ती व मार्केट एरीयातील रहदारीच्या क्षेत्रात सुरक्षेच्या कारणास्तव सदरहू रोहीत्र हे अतिसंवेदनशील आहे. अपिलार्थींचा वीज भार हा सुध्दा संवेदनशील रोहीत्रावर येणार असल्यामुळे व सदर रोहीत्र दाट लोकवस्तीत व रस्त्यालगत असल्याने रोहीत्राची क्षमतावाढ करणे शक्य नव्हते, कारण त्यास प्लींथ व फेसींग करणेस जागा उपलब्ध नव्हती. कृती मानके व भरपाईचे निश्चितीकरण विनियम २०२१ मधील तरतूदीनूसार सदर कनेक्शन देणेकामी अतिरीक्त रोहीत्र प्रस्तावित करणे क्रमप्राप्त होते. प्रतिवादीने पर्यायी जागेचा सर्व्हे करून नवीन जागेत रोहीत्र कार्यान्वित केले. नंतर दिनांक १५ सप्टेंबर २०२१ रोजी विभागीय कार्यालयाने अंदाजपत्रक मंजूर करून अनामत रक्कम भरण्याबाबत कोटेशन दिले, परंतू अपिलार्थीने दिनांक २८ ऑगष्ट २०२१ रोजी ऑनलाईन पध्दतीने अगोदरच कोटेशनचे पैसे भरले होते. दिनांक २४ डिसेंबर २०२१ रोजी अतिरीक्त रोहीत्र उभारणीचे काम पर्ण झाल्यावर दिनांक २६ डिसेंबर २०२१ रोजी अर्जदारास घरगुती कनेक्शन देण्यात आलो.

८. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता वितरण परवानाधारकाच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वॉलिटी) विनियम २०२१, हे दिनांक २५ फेब्रुवारी २०२१ मध्ये प्रकाशित झाले. त्या विनियमानुसार नवीन वीज जोडणीबाबतची कृती मानके खालील प्रमाणे ठरविलेली आहेत.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

जोडपत्र - २

*कृतीच्या मानकांची पूर्तता न केल्यामुळे ग्राहकांना द्यावयाची भरपाई*

| पुरवठयाचे कार्य / घटना | | मानक | देय भरपाई | Automatic/Manual |
|---|---|---|---|---|
| १. विद्युत पुरवठा (तात्पूरत्या जोडणीसह) सुरू करणे | | | | |
| (एक) | ...... | ...... | ...... | ...... |
| (दोन) | परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्याच्या तारखेपासून आणि आकारांचा भरणा केल्यानंतर, पुरवठा करावयाचा कालावधी | | रु. ५०/- विलंबाच्या प्रति आठवडयास किंवा त्याच्या भागास, ग्राहक वर्गवारीसाठी लागू असलेल्या सेवा जोडणी आकाराच्या जास्तीत जास्त दुपटीच्या अधीन राहून | |
| | - अस्तित्वात असलेल्या विद्युत जाळयातून कोणत्याही क्षमता वाढीशिवाय जोडणी द्यावयाची असल्यास | (१) महानगर क्षेत्रातील महापालिका क्षेत्रात - सात (७) दिवस (२) महानगर क्षेत्रातील महापालिका वगळून नागरी क्षेत्रात - पंधरा (१५) दिवस (३) ग्रामीण क्षेत्रात - तीस (30) दिवस | | Automatic |
| | - वितरण मेन्सचा विस्तार किंवा वाढ करावयाची असल्यास | तीन (३) महिने | | Automatic |
| | - वितरण यंत्रणेचा भाग असलेले नवीन उप केंद्र सुरू करावयाची गरज असल्यास | एक (१) वर्ष | | Automatic |

तसेच या कृतीमानकात खालील प्रमाणे सुट देण्यात आली आहे.

*"२६. सुट*

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

*२६.१ आयोगाच्या मते, वितरण परवानाधारक जर खालील बाबींमुळे, या विनियमांतील त्याच्यावरील जबाबदाऱ्या पार पाडू शकत नसेल, तर या विनियमातील कोणतीही बाब त्याला लागू होणार नाही -*

*ए. दैवी आपत्तीच्या घटना जसे की, चक्रीवादळ, पूर, वादळ युध्द, बंड नागरी अशांतता, दंगली, वीज, भुकंप, टाळेबंदी, वीज पुरवठा सावधगिरीने खंडीत करणे, आग ज्यामुळे परवानाधारकाच्या विद्युत संच मांडणीवर किंवा कार्यावर विपरीत परिणाम झाला असेल,*

*बी. वीज निर्मितीतील बिघाडामुळे किंवा पारेषण जाळयातील बिघाडामुळे जर काम बंद ठेवावे लागले तर;*

*सी. राष्ट्रीय भार प्रेषण केंद्र / प्रादेशिक भार प्रेषण केंद्र / राज्य भार प्रेषण केंद्राकडुन त्यांच्या सुविधांतील बिघाडामुळे जर आऊटेज करण्यात आले तर;*

*डी. किंवा वितरण परवानाधारकच्या नियंत्रणाबाहेरील अन्य घटना.*

*परंतू असे की, या विनियमातील कृतीची मानके साध्य करण्यात वितरण परवानाधारकास आलेल्या अपयशाचे कारण जर वितरण प्रणालीच्या प्रतिबंधक देखभालीत कमतरता किंवा निष्काळजीपणा किंवा त्रुटी असेल किंवा वितरण परवानाधारकाने वाजवी सावधगिरी दाखवून योग्य उपाययोजना न करणे हे असेल तर, वितरण परवानाधारकास या अपयशासाठी माफ करता येत नाही."*

९. या गाऱ्हाण्याचा उहापोह करताना असे निदर्शनास येते की, अपिलार्थीचा दिनांक १९ जानेवारी २०२१ रोजी परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यावर प्रतिवादींनी सदर जागेची स्थळतपासणी तात्काळ केली. अपिलार्थींना १८ केडब्ल्यू वीज भाराची आवश्यकता होती. त्याभागातील एसटी स्टॅंड रोहीत्र हे पोल माउंटेड २०० केव्हीए क्षमतेचे असून त्यावर ९०% ते ९५% लोड होता. त्यामुळे सदर रोहीत्रावरून वीज कनेक्शन देणे प्रतिवादींना शक्य नव्हते. अपिलार्थींकडे रोहीत्र बसविण्यासाठी जागेची मागणी केली असता, अपिलार्थींनी त्यास प्रतिसाद दिला नाही. सदरहू रोहीत्र अती दाट लोकवस्ती व मार्केट एरीयातील रहदारीच्या क्षेत्रात आहे. त्यामुळे रोहीत्राची क्षमतावाढ, प्लींथ व फेसींग करणेस जागा उपलब्ध नसल्याने ते शक्य नव्हते. प्रतिवादींनी अतिरीक्त रोहीत्र उभे करण्याची योजना तयार केली. अपिलार्थीने दिनांक २८ ऑगष्ट २०२१ रोजी ऑनलाईन पध्दतीने कोटेशनचे पैसे भरले होते. दिनांक २४ डिसेंबर २०२१ रोजी अतिरीक्त रोहीत्र उभारणीचे काम पर्ण झाल्यावर दिनांक २६ डिसेंबर २०२१ रोजी अर्जदारास घरगुती कनेक्शन देण्यात आले. शिवाय सदर कालावधीत अपिलार्थी हे वीज वापरापासून वंचित नव्हते. प्रतिवादींनी असे नमुद केले की, पाचगणी विभागाची भौगोलिक परिस्थिती

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

पाहता पावसाळयात मोठया प्रमाणात ब्रेकडाऊन होते. कोव्हीड १९ मुळे व अपुऱ्या साधनसामुग्रीमुळे २०२१ मध्ये वेळेत काम करण्यास मोठया प्रमाणात अडचणी निर्माण झाल्या.

१०. कोवीड १९ महामारीमुळे दिनांक २३ मार्च २०20 ते जून २०20 या कालावधीत राज्यामध्ये पूर्णतः लॉकाडाऊन लागू होता. नंतर लॉकडाऊनच्या अटी काही प्रमाणात शिथिल करण्यात आल्या. तदनंतर कोवोड १९ ची दुसरी लाट व तिसरी लाट २०२१ या वर्षात होती. अपिलार्थींचा कृती मानकांनुसार भरपाई मिळण्याचा कालावधी हा २०२१ मधील असून कोव्हीड १९ च्या दुसऱ्या लाटमधील आह. माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २३ मार्च २०20, ६ मे २०20, १० जुलै २०20, ८ मार्च २०२१ रोजीच्या सु मोटो रिट (सिव्हील) याचिका (क्र.४८४११/२०20) लॉकडाऊन काळात याचिका कर्त्यांच्या अडचणी लक्षात घेऊन वेळोवेळी कोव्हीड १९ ची परिस्थिती विचारात घेऊन वेळ वाढवून दिला आहे. सदरह् अभिवेदने सुध्दा त्याच कालावधीतील आहेत. म्हणून कृती मानके व भरपाईचे निश्चितीकरण विनियम २०२१ नुसार अपिलार्थी हे नुकसान भरपाईस पात्र नाही.

११. मंचाने आपल्या आदेशात सर्व बाबींचा यथोचित उहापोह केला असल्याने मंचाच्या आदेशात बदल करण्याचे प्रयोजन नाही. सबब, अपिलार्थींची अभिवेदन नामंजूर करण्यात येत आहेत. सदरचो अभिवेदन निकाली काढण्यात येत आहेत.

सही/-
(वन्दना कृष्णा)
विद्युत लोकपाल (मुंबई)

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.